**रोजगार व स्वयंरोजगार मेळावे आयोजित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक:- स्थालोरो-२००८/प्र.क्र.९३(भाग-१)/उद्योग-६**
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २० सप्टेंबर, २०१९

वाचा:- १. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.-स्थालोरो-२००८/प्र.क्र.९३/उद्योग-६ दिनांक १७.११.२००८.
२. शासन निर्णय रोजगार व स्वंयरोजगार विभाग क्र.- धोरण-२०००/प्र.क्र.१५८/रोस्वरो-१, दिनांक ६ ऑक्टोबर,२०००.
३. शासन निर्णय रोजगार व स्वंयरोजगार विभाग क्र.- रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१, दिनांक २९ जून,२००७.
४. शासन निर्णय रोजगार व स्वंयरोजगार विभाग क्र.- रोस्वरो-२००७/प्र.क्र.४१/रोस्वरो-१, दिनांक १३ ऑगस्ट,२००९.
५. शासन निर्णय उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.-स्थालोरो-२००८/प्र.क्र.९३/उद्योग-६ दिनांक २४.४.२०१८.

**प्रस्तावना:-**

औद्योगिक विकासाव्दारे राज्यातील स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी स्थानिक लोकांना औद्योगिक उपक्रमांमधील नोकऱ्यांमध्ये प्राधान्य देण्याचे धोरण क्रमांक १ येथील शासन निर्णयाव्दारे अवलंबविले आहे, तसेच कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या रोजगार व स्वयंरोजगार धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार/स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यासाठी नियोक्ते, कारखानदार, सुशिक्षित बेरोजगार यांचे एकत्रित रोजगार मेळावे आयोजित करण्याबाबत क्रमांक २ ते ४ येथील शासन निर्णयाव्दारे निर्देशित केलेले आहे. राज्यातील औद्योगिक क्षेत्रामध्ये स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होण्यासाठी व औद्योगिक विकासामुळे निर्माण होणाऱ्या स्वयंरोजगाराच्या पर्याप्त संधीव्दारे राज्यात सुक्ष्म व लघु उपक्रम स्थापीत होण्यासाठी, राज्यात विविध ठिकाणी रोजगार व स्वयंरोजगार मेळावे घेऊन, स्थानिक लोकांना रोजगारामध्ये प्राधान्य व स्वयंरोजगारासाठी पूरक वातावरणासाठी मार्गदर्शक सूचना देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधिन होती. यासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक २४/४/२०१८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी करत असताना काही त्रुटया व कमतरता निदर्शनास आल्याने व त्या दूर करणे आवश्यक असल्याने सदर दिनांक २४/४/२०१८ रोजीचा समक्रमांकित शासन निर्णय अधिक्रमित करून खालीलप्रमाणे सुधारीत शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे :-

**शासन निर्णय:-**

राज्यातील स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना रोजगाराच्या व स्वयंरोजगाराच्या संधी अधिक प्रमाणात उपलब्ध होण्यासाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध असलेल्या औद्योगिक क्षेत्रामध्ये व स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांकडे असलेले कौशल्य यांचा योग्य तो ताळमेळ करून स्थानिक व इतरत्र स्तरावर औद्योगिक आस्थापनांमध्ये रोजगार व स्वयंरोजगाराव्दारे रोजगार उपलब्ध होण्यासाठी जिल्हास्तरीय /औद्योगिक क्षेत्रनिहाय रोजगार स्वयंरोजगार मेळावे मा. मंत्री (उद्योग) यांच्या मान्यतेने आयोजित करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे यशस्वी आयोजन, समन्वय व संनियंत्रणासाठी आणि सदरहू कार्यक्रमासाठी होणाऱ्या खर्चाबाबतचे निर्णय, मान्यता व इतर अनुषंगीक बाबींची जबाबदारी विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय यांची राहील. मेळाव्यासाठी होणाऱ्या खर्चाची मागणी विकास आयुक्त (उद्योग) यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांच्याकडे करावी व त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई यांनी याबाबतची आर्थिक तरतूद करून त्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

३. जिल्ह्यातील/औद्योगिक क्षेत्रातील मोठे/मध्यम उद्योग, विविध औद्योगिक संघटना तसेच व्यापारी आस्थापना, हॉटेल्स, रुग्णालये, मॉल्स,बांधकाम व्यावसायिक इ. यांच्याकडून आवश्यक असणाऱ्या मनुष्यबळाची निकड, शैक्षणिक पात्रता, आवश्यक कौशल्य इ. बाबतची आवश्यक माहिती उद्योग संचालनालयाने आवश्यकते प्रमाणे कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून समन्वयाने उपलब्ध करून घ्यावी.

४. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील उदयोग घटकास आवश्यक असणारी मनुष्यबळाची माहिती तसेच सेवा/उत्पादक पुरवठादार (Vendor) निश्चित करून या संदर्भातील माहितीबाबतची कार्यवाही महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची राहील.संबंधित महाव्यवस्थापक, जिल्हा उदयोग केंद्र/विभागीय उद्योग सहसंचालक यांनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्राबाहेरील औद्योगिक उपक्रम/घटक,इतर आस्थापना यांना आवश्यक मनुष्यबळ तसेच त्यासंबंधीत शैक्षणिक पात्रता व कौशल्याबाबतची माहिती कौशल्य विकास व उदयोजकता विभाग यांच्या समन्वयाने प्राप्त करावी.

५. रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्यामध्ये रोजगारासाठी इच्छूक असणाऱ्या युवक/युवतींच्या नोंदणीसाठी आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता विभागाकडून निर्माण केलेल्या www.mahaswayam.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहे. सदर संकेतस्थळावर जिल्ह्यातील इच्छूक युवक/युवती नोंदणी करतील. इच्छूक बेरोजगारांच्या माहितीचे योग्य विश्लेषण करून त्यानुसार जिल्ह्यातील मोठे उद्योग घटक व इतर आस्थापनांना निमंत्रित करण्याची व मेळाव्यामध्ये प्रत्यक्ष मुलाखतीचे आयोजन करून नोकर भरतीसाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याची तसेच मेळाव्यानंतर सहभागी उमेदवारांना पाठपुराव्याबाबत वेगळे संकेतस्थळ निर्माण करण्याची आणि समन्वय व संनियंत्रणाची जबाबदारी उद्योग संचालनालयाची राहील.

६. रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्यामध्ये स्वयंरोजगारासाठी स्वतंत्र कार्यशाळा/परिषद आयोजित करून त्यामध्ये स्वयंरोजगारासाठी आवश्यक शासनाच्या विविध योजनांची माहिती, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, या स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन इत्यादिबाबत विशेषतंज्ञाचे संवाद, मार्गदर्शन आयोजित करण्यात यावे. संबंधित योजनांची माहितीपत्रके, भितीपत्रके, पोस्टर्स, बॅनर्स इ. विविध विभाग/मंडळ/महामंडळे/वित्तीय संस्था यांचे स्टॉल तसेच अर्थसहाय्यासाठी वित्तीय संस्थांची माहिती इत्यादिचे आयोजन करावे याबाबतचे समन्वय व संनियंत्रण विभागीय उद्योग सह संचालक/महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र यांनी करावे.

७. मेळाव्यांबाबत योग्य प्रसिध्दी व प्रचार करण्यात यावा.

८. रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याच्या प्रभावी आयोजनासाठी नॉलेज पार्टनर म्हणून कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रिज (CII) यांची सहमती प्राप्त करून घ्यावी.

९. राज्य पातळीवर रोजगार व स्वयंरोजगाराच्या मेळाव्याबाबत खालीलप्रमाणे समिती स्थापित करण्यात येत असून, या समितीमार्फत राज्यस्तरावरील समन्वय,अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| १. | विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय | अध्यक्ष |
| २. | सहमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ( आस्थापना ) | सदस्य |
| ३. | कामगार आयुक्त | सदस्य |
| ४. | आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | सदस्य |
| ५. | संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी | निमंत्रित |
| ६. | संचालक,तंत्र शिक्षण | निमंत्रित |
| ७. | सह/उप सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग. | सदस्य |
| ८. | राज्यातील औद्योगिक संघटनांचे ५ प्रतिनिधी (सदर प्रतिनिधींची निवड मा. मंत्री (उद्योग) करतील. अशासदस्यांची निवड प्रत्येकी २ वर्षासाठी राहील व ते पूर्ण नेमणूकीस पात्र राहतील.) | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ९. | संबंधित प्रादेशिक उद्योग सहसंचालक /अधिक्षकीय उद्योग अधिकारी | सदस्य सचिव |
| १०. | महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे संबंधित प्रादेशिक अधिकारी | सदस्य |

राज्यस्तरावरील उपरोक्त समितीची बैठक वर्षातून किमान दोनदा घेण्यात येईल व समितीकडून राज्यातील रोजगार व स्वयंरोजगार मेळावे फलश्रुती, नियोजन, संबंधित महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र/ प्रादेशिक उद्योग सहसंचालक /अधिक्षकीय उद्योग अधिकारी यांनी केलेली कार्यवाही व त्यांच्या सूचनांसंदर्भात निर्णय इत्यादिबाबत आढावा घेण्यात येईल. राज्यस्तरीय समिती याबाबतचा सविस्तर अहवाल प्रधान सचिव/ अतिरिक्त मुख्य सचिव (उद्योग) यांचेमार्फत मा.मंत्री (उद्योग) यांना सादर करतील.

१०. सदर मेळाव्यांच्या फलश्रुतीचा आढावा उद्योग संचालनालय यांनी सहा महिन्यांनी घ्यावा व त्याचा अहवाल शासनास नियमित सादर करावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१९०९२११७०७०११३१० असा आहे. हा निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Kavita Vijay Pawar

Digitally signed by Kavita Vijay Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industries, Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a3b87786359abd7b3f135e9849f2f0e3f2ca97e8ca2dd67ad836635a3aa0ea9, serialNumber=6f8674619c7f615d9eeac52c9289956e27601f17938f0e253b14bde8e35e822e, cn=Kavita Vijay Pawar
Date: 2019.09.21 16:56:56 +05'30'

**( कविता पवार )**

**कक्ष अधिकारी**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई-३२.
३. सर्व मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
५. मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,विधानभवन, मुंबई.
६.मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
७. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग, मंत्रालय,मुंबई-३२.
९. प्रधान सचिव (कामगार ), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. प्रधान सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय, मुंबई.
११. सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पश्चिम), मुंबई.
१३. विकास आयुक्त (उद्योग), उद्योग संचालनालय, नवीन प्रशासन भवन, मुंबई-३२.
१४. सर्व विभागीय आयुक्त.
१५. सर्व जिल्हाधिकारी.
१६. आयुक्त, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई.
१७. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१८. उद्योग सहसंचालक, उद्योग संचालनालय विभागीय कार्यालय,ठाणे/नाशिक/औरंगाबाद/पुणे/नागपूर/अमरावती. (उद्योग संचालनालयामार्फत)
१९. उद्योग सहसंचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई.
२०. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, (उद्योग संचालनालयामार्फत)
२१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई.
२२. निवडनस्ती (उद्योग-६ )